गुरुवार दि.६ जून २०२४

किंमत २ रुपये । महाराष्ट्र

मराठी दैनिक

वर्ष : ०१ अंक : २७८

टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता

बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे


Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 www. lokneta.com







## महाराष्ट्रात खरा 'खेळ' अजून बाकी



लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात पुढील काही दिवसांत मोठी उलथापालथ होण्याची शक्यता आहे. लोकसभा निवडणुकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचा ७ जागांवर विजय झाला आहे. पण या ७ पैकी अर्ध्याहून अधिक खासदार उद्धव ठाकरे यांच्या संपर्कात आहेत. ते योग्यवेळी शिंदेंची साथ सोडून ठाकरेंच्या गोटात सहभागी होतील, असा दावा सूत्रांनी केला आहे. या दाव्यामुळे महायुतीतील घटकपक्षांना आपल्या खासदारांना एकजूट ठेवण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे.



# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे अनेक खासदार उद्धव ठाकरेंच्या संपर्कात असल्याचा दावा

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**मुंबई (वृत्तसंस्था)**

उद्धव ठाकरे केंद्रात इंडिया आघाडीचे सरकार स्थापन करण्याच्या मुद्यावर अत्यंत गंभीर आहेत. महाराष्ट्रात पुढील काही महिन्यांत विधानसभा निवडणुकीचा फड रंगणार आहे. त्यातच इंडिया आघाडीने लोकसभा निवडणुकीत ज्या प्रकारे घवघवीत यश संपादन केले आहे, ते पाहून एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेच्या नवनिर्वाचित खासदारांची मनस्थिती डळमळीत झाली आहे. त्यामुळे गरज भासली तर उद्धव ठाकरे शिंदेंच्या खासदारांना आपल्या गोटात ओढून भाजप प्रणित एनडीएला जोरदार झटका देऊ शकतात. सूत्रांनी मंगळवारीच शरद पवारांनी जदयु व तेदेपाशी संपर्क साधल्याचा दावा केला होता हे विशेष. पवारांनी हा दावा फेटाळला ही गोष्ट वेगळी.उल्लेखनीय बाब म्हणजे भाजप प्रणित एनडीएला केंद्रात स्पष्ट बहुमत मिळाले. पण यावेळी भाजपने अनेक राज्यांत अत्यंत सुमार कामगिरी केली. यात महाराष्ट्र व उत्ततर प्रदेशाचा समावेश आहे. महाराष्ट्रात राज्य पातळीवर स्थापन झालेल्या भाजप, शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस या महायुतीला लोकसभा निवडणुकीत अवघ्या १७ जागा मिळाल्या. त्यात भाजपला सर्वाधिक ९, शिवसेनेला ७ व राष्ट्रवादीला केवळ एका जागेवर समाधान मानावे लागले. पण आता सूत्रांनी एबीपी न्यूजशी बोलताना शिवसेनेचे अर्ध्याहून अधिक खासदार उद्धव ठाकरे यांच्या संपर्कात असल्याचा दावा करून महायुतीच्या तोंडचे पाणी पळवले आहे.दुसरीकडे, काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महाविकास आघाडीला महाराष्ट्रातील ४८ पैकी तब्बल ३० जागा मिळाल्या आहेत. सांगलीच्या एका जागेवर विशाल पाटील हे काँग्रेसचे बंडखोर खासदार निवडून आलेत. ते ही महाविकास आघाडीला पाठिंबा देण्याची शक्यता आहे. त्यामुळे मविआचा राज्यातील आकडा ३१ जागांवर पोहोचण्याची शक्यता आहे.याऊलट देशभरात एनडीएला सर्वाधिक २९३ जागा मिळाल्यात, तर इंडिया आघाडीला अवघ्या २३४ जागांवर समाधान मानावे लागले आहे. पण त्यानंतरही इंडिया आघाडीच्या काही नेत्यांनी केंद्रात सरकार स्थापन करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा दावा केला आहे. यामुळेच इंडिया आघाडीचे नेते इतर पक्षांच्या नेत्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करत आहेत. दरम्यान, इंडिया आघाडीला बहुमताचा २७२ चा आकडा गाठणे फार अवघड असल्याचे दिसून येत आहे.




वसंतराव नाईक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाटोदा या विद्यालयाचे उपक्रमशील कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक श्री.तुकाराम तुपे सर यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना. विद्यालयातील सर्व शिक्षक वृंद व कर्मचारी वर्ग.(छाया–लोकनेता न्युज नेटवर्क पाटोदा.)

## दीप भारती विद्यालयात झाडे लावून जागतिक पर्यावरण दिन साजरा

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**शेख जफर । भोकरदन**



आज जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने सम्राट अशोक शिक्षण संस्थेच्या दिपभारती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय , दानापूर येथे वन विभाग व शाळा यांच्या संयुक्त विद्यमानाने शाळेचे मुख्याध्यापक वाय. एस. गवळी व पी. बी. वाडे ( वनपरिक्षेत्र अधिकारी ) भोकरदन यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले . याप्रसंगी विद्यालयाचा विद्यार्थी महेश विनोद पवार याने चइइड (छएएढ) परीक्षेत यश संपादन केल्याबद्दल त्याचे व त्याच्या वडिलांचे सत्कार करण्यात आले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आले आहे शाळेचे मुख्याध्यापक वाय. एस. गवळी सर व उपस्थित सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यावतीने महेशचा सत्कार करण्यात आला . यावेळी व्ही. एच. फुले ( वनपाल ) , व्ही. आर. सपकाळ ( वनपाल ) , एस. एम. सागरे ( वनरक्षक ) , वाय. के. लवंगे ( वनरक्षक ) , शेख अन्वर , कैलास दळवी के. वाय. वाडकर ( वन कर्मचारी ) विद्यार्थी व पालक उपस्थित होते .

## नुकत्याच झालेल्या वैद्यकीय परीक्षेचा निकाल लागला असून त्यात महेश पवार चा घवघवीत यश



**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**शेख जफर । भोकरदन**

५ मे रोजी वैद्यकीय परीक्षेचा निकाल लागला असून या परीक्षेत भोकरदन तालुक्यातील दानापूर येथील महेश विनोद पवार याने नीट (वैद्यकीय प्रवेश परीक्षा ) या परीक्षेमध्ये ७२० पैकी ६६५ गुण घेऊ घवघवीत यश मिळवले याबद्दल त्याचे पवार परिवार व गावातर्फे त्याचा अभिनंदन करण्यात आलं दानापूर गावातून अध्यापर्यंत या परीक्षेत यश संपादन करणारा हा प्रथम विद्यार्थी आहे या विद्यार्थ्यांचा पालक वर्ग नातेवाईक व गावकऱ्यातून कौतुक होत आहे.

## जागतिक पर्यावरण दिन वृक्षारोपणाने साजरा करावा–वनश्री.जनाबापू मेहेत्रे

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**





पर्यावरणाला गृहित धरण्याच्या मानवी प्रवृत्तीमुळे पर्यावरणाचा समतोल ढासळत आहे.त्याचा सर्व सजीव सृष्टीवर विघातक परिणाम होत आहे.यातूनच पर्यावरणा बाबतच्या जागृतीची गरज निर्माण झाली.म्हणूनच १९७२ साली युनोच्या सर्वसाधारण सभेने मानव व पर्यावरण या विषयी आयोजित केलेल्या परिषदेत पर्यावरण दिन साजरा करण्याचे ठरविले.संयुक्त राष्ट्रसंघाच्या पर्यावरण विषयक कार्यक्रमातून पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनासाठी सामाजिक, राजकीय,औद्योगिक तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या पातळीवर कृतिशील सहभाग मिळविण्याचे उद्दिष्ट ठेवले गेले. त्यानुसार शाश्वत विकासावर भर देण्यात आला. संपूर्ण जगात पर्यावरण साक्षरता वाढीस लागून आपला मूलाधार असलेले पर्यावरण सुरक्षित राहावे यासाठी वसुंधरेवरील प्रत्येकाने वृक्षारोपण व वृक्ष संगोपन तथा इतर पर्यावरण संवर्धनात्मक उपक्रमांनी जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्याचे आवाहन मातृतिर्थ सिंदखेड राजा येथील महाराष्ट्र शासनाचा छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार विजेते ज्येष्ठ पर्यावरण प्रेमी वनश्री जनाबापू मेहेत्रे यांनी केले.वनश्री मेहेत्रे पुढे बोलतांना म्हणाले की शासन,प्रशासन, सामाजिक कार्यकर्ते,विविध सेवाभावी संस्था व संघटणे आपापल्या परीने पर्यावरण संवर्धन करीत असून समाजातील प्रत्येकाने पर्यावरण संवर्धन चळवळीत सहभागी होऊन उचित योगदान दिल्यास पर्यावरण संवर्धन चळवळ ही लोक चळवळ होईल.असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.पर्यावरणाबद्दलच्या कृतज्ञतेच्या भावनेतुन प्रत्येकाने राष्ट्रीय सण – उत्सव, थोरा मोठ्यांची जयंती – पुण्यतिथी, वाढदिवस,लग्नाचा वाढदिवस, मैत्रीचे प्रतीक,प्रेमाचे प्रतीक, जीवनातील सोनेरी क्षण तथा कुटुंबातील मयत व्यक्तीच्या स्मृती निमित्ताने उचित ठिकाणी देशी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचे नम्र आवाहन वनश्री जनाबापू मेहेत्रे यांनी केले.

## वीज वितरण कंपनीच्या भोंगळ कारभारामुळे शेतकरी पुत्राचा मृत्यू

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**लोणार । विनायक कुटे**

लोणार तालुक्यातील मांडवा येथील शेतकरी पुत्र फरान खॉ सुभान खॉ पठाण यांचा आज ५ जून रोजी दुपारी दीड वाजेच्या सुमारास खाली लोंबकाळलेल्या एलेवेन केवीच्या तारेचा करंट लागल्याने मृत्यू झाल्याची घटना मांडवा शिवारातील प्रकाश आसाराम वाघ यांच्या गट नंबर ३१९ मधील शेतामध्ये घडली आहे.



याबाबत सविस्तर वृत्त असे की, पेरणीचे दिवस जवळ आल्याने शेतीच्या मशागतीला सुरुवात झाली आहे. फरान खॉ पठाण यांनी आपल्या शेताच्या शेजारी असलेल्या प्रकाश आसाराम वाघ यांच्या बैलगाडीत. शेतात वखर पाळी घालण्यासाठी घरून वखर घेतला होता. बैलगाडी प्रकाश वाघ यांच्या गोठ्याजवळ उभी केली आणि गाडीतून वखर खाली उतरत असताना, फरान यांनी वखर खांद्यावर घेतला तेव्हा वखराच्या दांडीचा खाली लोंबकाळलेल्या एलेव्हन केवीच्या तारेचा स्पर्श झाल्याने त्यांना जबरदस्त करंट लागला. खरे तर एलेव्हन केवीची तार ही जमिनीपासून वीस फूट उंच असायला पाहिजे. परंतु, घटनास्थळावरील सदर तार ही फक्त आठ ते नऊ फूट उंच आहे. ही तार ज्या स्थिती आहे. त्यापेक्षा पेक्षा चार ते पाच फूट जर उंच असती तर कदाचित फरानचा या तारेला स्पर्श झाला नसता. फरान खाली कोसळल्यावर प्रकाश वाघ यांनी फरांनच्या चुलत भाऊ सिंकदर खॉ सरदार खॉ पठाण यास फोन करून शेतात बोलविले. आणि फरानला मोटरसायकलवर बसून बीबी ग्रामीण रुग्णालय येथे आणले असता. डॉक्टरांनी फरानला मृत घोषित केले. फरान हा एलएलबी च्या शेवटच्या वर्षात शिक्षण घेत होता. तो आई–वडिलांना एकुलता एक मुलगा होता. त्याच्या पश्चात आई–वडील व तीन बहिणी आहेत. फरानच्या अशा अचानक जाण्याने मांडवा गावासह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

**झाडे लावा झाडे जगवा**

### चारोळी

धग भुईची शमवाया
नेसवू तिला हिरवा शालू
जागर करू वृक्षारोपणाचा
पदरात रोपट्याचे वाण घालू.

रंजना सानप
मायणी (सातारा)

## स्वानंद सार्वजानिक वाचनालयात जागतीक पर्यावरण दिन साजरा

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**केज । अमोल सावंत**

स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता.केज जि. बीड येथे दिनांक ५-६-२०२४ रोजी जागतीक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला.

अध्यक्ष स्थानी रावसाहेब जाधव हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून एस.पी . गायकवाड, माजी सरपंच रामराजे गायकवाड, एस. के. वैरागे, रमेश गायकवाड, सी.ए. गायकवाड, नाना जाधव, शिवराज जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी एस.पी. गायकवाड, रामराजे गायकवाड, एस. क. वैरागे, रमेश गायकवाड यांनी मार्गदशन केले. सी.ए. गायकवाड, नाना जाधव, शिवरा जाधव यांच्यासह मोठया संखेने उपस्थिती होती. दिनांक ३१-५-२०२४ रोजी अहिल्या बाई होळकर यांची जयंती संपली झाली. यावेळी बाळासाहेब गायकवाड, समर्थ गायकवाड, दादासाहेब गायकवाड, अजिंक्य गायकवाड, ज्ञानेश्वर गायकवाड, माजी सरपंच रामराजे गायकवाड,रमेश गायकवाड, रावसाहेब गायकवाड यांची उपस्थिती होती.



संपादकीय

# बहुसांस्कृति कतेला धोका



लोकनेता न्यूज नेटवर्क

अँडोनिओ ग्राम्शी (१८९१–१९३७) या इटलीतील तत्त्ववेत्त्याने प्रभुत्ववादाचा सिद्धांत व सांस्कृतिक प्रभुत्ववाद असा सिद्धांत मांडला आहे. वरिष्ठ वर्ग स्वत:चे प्रभुत्व समाजावर केवळ तुरुंग, पोलिस यांचा धाक दाखवून ठेवत नाही, तर आपल्या फायद्याची मूल्ये धर्म, संस्कृती, शिक्षण याच्या माध्यमातून शोषित वर्गावर अशा पद्धतीने लादतो, की स्वत:चे नुकसान करणारी मूल्ये कनिष्ठ वर्ग स्वखुषीने स्वीकारतो. उदा. चातुर्वर्ण्य. पाप–पुण्य, कर्मविपाकाचा मुलामा दिल्यामुळे बहुजन समाजाने अनेक हजार वर्षे चातुर्वर्ण्य बिनतक्रार स्वीकारला. फुले–शाहू–आंबेडकरांनी भारतीय समाजात नवी जागृती आणली; पण 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' व 'राज्य अभ्यासक्रम आराखडा' वरच्या वर्गाचा 'संस्कृती प्रभुत्ववाद' इतर समाजावर लादण्याचा प्रयत्न करीत आहे.भारत हा बहुसांस्कृतिक, बहुधर्मीय देश आहे; त्यामुळे भारतीय संस्कृती सर्वसमावेशक आहे. या आराखड्यात भारतीय संस्कृती असा शब्दप्रयोग केला आहे. प्रत्यक्षात भारतीय संस्कृती म्हणजे केवळ हिंदू संस्कृती, असे या अभ्यासक्रम आराखड्यात गृहीत धरण्यात आल्याने संस्कृतीची विविधता या आराखड्यात दिसत नाही. या आराखड्यात घटनात्मक मूल्यांपेक्षा वैयक्तिक मूल्यांना जास्त महत्त्व देण्यात आले आहे. अजून तरी भारतीय राज्यघटनेच्या प्रास्ताविकेत काही बदल झालेले नाहीत; तरीदेखील 'बंधुता', 'धर्मनिरपेक्षता' व 'समाजवाद' या मूल्यांचा उल्लेख राज्य अभ्यासक्रम आराखड्यात केलेला नाही. मूल्यशिक्षणाच्या नावाखाली विशिष्ट धर्मपरंपरा इतरांवर लादायचा प्रयत्न या आराखड्यात दिसून येतो.प्रत्येक समाजाला स्वत:च्या ज्ञान परंपरा असतात. त्याचा अभ्यास केवळ आत्मगौरवासाठी न करता, त्याकडे डोळसपणे पाहिले तरच भविष्य घडविता येते. या आराखड्यात भारतीय शिक्षण व्यवस्थेतील आर्यभट्ट, भास्कराचार्य आजी ११ विद्वानांची नावे नमूद केली आहेत. मात्र, एकाही विद्वान महिलेचे नाव यात समाविष्ट केलेले नाही. प्राचीन कालखंडात गार्गी, मैत्रेयी, लोपामुद्रा, संघमित्रा, महाप्रजापती गौतमी, आम्रपाली अशा विदूषी होऊन गेल्या; पण पुरुषप्रधानतेमुळे यांचा विसर आराखड्याला पडला आहे. यातून असाही एक संदेश जातो, की भारतीय ज्ञानप्रणाली आर्यांपासून सुरू झाली; पण आर्यपूर्व काळात प्रगत सिंधू संस्कृती होती. त्यात शेतीचा शोध स्त्रियांनी लावला होता, याचा ओझरता संदर्भही या आराखड्यात दिसत नाही. या ११ विद्वानांमध्ये लोकायत, गौतम बुद्ध व महावीर यांचा उल्लेख केलेला नाही; पण इतर पानांवर लोकायत व गौतम बुद्ध यांचा उल्लेख आहे.गुरू–शिष्य परंपरा ही भारतीय ज्ञानप्रणालीचे वैशिष्ट्य म्हणून नमूद केली आहे. ही प्रणाली गुरू केंद्रित आहे. यातून व्यक्तिप्रामाण्य, ग्रंथप्रामाण्य निर्माण झाले व त्यातून ज्ञानाचा विकास खुंटला. सॉक्रेटिसने 'डायलॉग' पद्धत, प्रश्न, शंका, चर्चा ही ज्ञानपरंपरा वापरली व त्यातून युरोप प्रगत झाला. 'चातुर्वर्ण्य' हे भारतीय ज्ञानप्रणालीचे वैशिष्ट्य आहे, हे मात्र या आराखड्यात लपविण्यात आले आहे. 'प्राचीन ज्ञान वारसा जपू या' या शीर्षकाखाली 'मनाचे श्लोक' व 'भगवद्गीता' यांच्या अध्यायाच्या पाठांतराच्या स्पर्धा घ्याव्यात असे सांगण्यात आले आहे. यातून मूल्यशिक्षण होते, असेही म्हटले जाते. शाळांमध्ये अनेक धर्मीय मुले असतात, याचे भान आराखडा करणाऱ्यांना दिसत नाही. मग त्रिपीटक, कुराण, बायबल का नको, असा वाद निर्माण होऊ शकतो. म्हणूनच, धर्मनिरपेक्ष नीतिशिक्षण हा एक मार्ग आहे. त्याऐवजी महात्मा फुले, संत तुकाराम, संत सावतामाळी, संत जनाबाई, मुक्ताई, तुकडोजी महाराज, गाडगेबाबा, कबीर, शेख महंमद, सुफी संत यांच्या काव्यांचा समावेश इथे होऊ शकतो.प्राचीन ज्ञानप्रणालीत कलेमध्ये संगीत, नृत्य, पाककला, स्थापत्य, भाषा, साहित्य यांमध्ये इतर धर्मीयांनी पुष्कळ भर घातली आहे. त्यातून भारतीय संस्कृती समृद्ध झाली आहे; पण याचे प्रतिबिंब आराखड्यात पडलेले नाही. मूल्य व स्वभाववृत्ती या प्रकरणाची सुरुवात 'मनुस्मृती'च्या श्लोकाने केली आहे. ही मांडणी भावी दिशादर्शक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'मनुस्मृती का जाळली' यावर 'बहिष्कृत भारता'त सविस्तर लेख लिहिला आहे. असे असताना मनुस्मृतीचे असे गौरवीकरण आक्षेपार्ह आहे. या अभ्यासक्रम आराखड्यातील हे सर्व उदात्तीकरण 'हिंदू राष्ट्र निर्मितीची' पायाभरणी आहे, असे म्हटल्याल चूक ठरू नये.भारतीय ज्ञानप्रणाली पुढे खंडीत का झाली, याची जाणीव हा आराखडा विद्यार्थ्यांना करून देत नाही. शून्याचा शोध भारतात लागला; पण आधुनिक गणित व संगणक परदेशात तयार झाले. असे सर्वच ज्ञानशाखांत झाले. याचे कारण म्हणजे चातुर्वर्ण्य व्यवस्था आणि जातिधिष्ठित ज्ञानाची मक्तेदारी. यामुळे ज्ञानाचा प्रसार झाला नाही आणि त्यामुळे ज्ञानात नवी भर पडली नाही. पर्यायाने ज्ञानपरंपरा खंडित झाल्या. भारतीय ज्ञानप्रणालीने शारीरिक कष्टाला तुच्छ लेखले. बलुतेदारांच्या व्यावसायिक कौशल्याला ज्ञान म्हणून मान्यता दिली नाही, म्हणून ज्ञानप्रणाली पुढे विकसित झाली नाही व औद्योगिक क्रांती भारतात न होता युरोपात झाली. या आराखड्यात आत्मगौरव आहे; पण मुलांना डोळस, विवेकनिष्ठ दृष्टिकोन देण्याचा प्रयत्न होताना दिसत नाही.भारतीय ज्ञानप्रणालीतील संमिश्रता, विज्ञानवाद, समता, मानवतेचा धागा पकडून पुढे जाणे गरजेचे आहे. हे केवळ धर्मनिरपेक्ष शिक्षणातूनच होऊ शकते.

# वाढता वाढे भ्रष्टाचार

लोकनेता न्यूज नेटवर्क



राज्यातील भ्रष्टाचाराची प्रकरणे पाहता भ्रष्टाचार हा शिष्टाचार नव्हे, तर अधिकार बनला की काय, अशी शंका उपस्थित होऊ लागली आहे. पुण्यातील कल्याणीनगर अपघाताच्या घटनेनंतर रोज नवनवीन गोष्टी उघडकीस येत आहेत. गरिबांचे जीव गेले तरी चालतील मात्र, सरकार व प्रशासन यांना पोसणारे विशाल अग्रवाल यांच्यासारखे पोशिंदे जिवंत राहिले पाहिजेत, अशीच सत्ताधाऱ्यांची भावना दिसते. पोलीस प्रशासन व पुण्यातील ससून रुग्णालयातील भ्रष्ट कारभाराचे लक्तरेच या घटनेतून वेशीवर टांगली गेली आहेत. एवढी बदनामी होऊनही सरकार यातून बोध घेताना दिसत नाही. अशा घटना घडल्या की, सत्ताधारी विरुद्ध विरोधक असा सामना रंगतो. त्यांच्यातील हा सामना उंदीर– मांजराचा खेळ ठरतो. सरकार कायदे बनवते, पण ते केवळ सामान्यांसाठी असतात. पैशाच्या जीवावर मौजमस्ती करणारे धनिक सत्ताधाऱ्यांना, प्रशासनाला हाताशी धरून आपल्याला पाहिजे त्याप्रमाणे या कायद्यांचा दुरुपयोग करत असतात. पुण्यातील अपघाताच्या घटनेनंतर आमदार रवींद्र धंगेकर व शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे यांनी उत्पादन शुल्क कार्यालयात आंदोलन करत येथील अधिकारी कशाप्रकारे हप्तावसुली करतात याचे रेटकार्डच माध्यमांसमोर वाचून दाखवले. पुण्यातील पब संस्कृतीचा पर्दाफाश करणाऱ्या या दोघांनी त्यावेळी राज्य उत्पादन शुल्कमंत्री शंभुराज देसाई यांचेही नाव घेतल्याने आता देसाईंनी या दोघांवर कायदेशीर कारवाईचा इशारा दिला आहे. या दोघांनी माफी मागितली नाही तर मी ७२ तासांत संबंधितांना नोटीस बजावणार असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे. देसाईंनी घेतलेला हा पवित्रा म्हणजे चोर सोडून संन्याशाला फाशी देणे, असेच म्हणावे लागेल. याप्रकरणी त्यांनी आपल्या ताब्यातील उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांवर कारवाई करणे अपेक्षित आहे. राजकीय कुरघोडीतून का होईना विरोधकांनी पोलीस अवैध धंद्यांना पाठीशी घालत त्यांच्याकडून उकळत असलेल्या हप्त्याची यादी जाहीर केली आहे. त्यावर एक नजर तरी देसाईंनी टाकायला हवी होती. राज्यातील दारू दुकाने, बार व पबमध्ये अल्पवयीन मुलांना दारू पिण्यास बंदी असताना विशाल अग्रवाल यांचा अल्पवयीन मुलगा या ठिकाणी रात्री दोनपर्यंत आपल्या अल्पवयीन मित्रांसमवेत पार्टी करत होता. दारूच्या आहारी गेल्याने भरधाव वाहन चालवत त्याने दोघांना चिरडले. पुण्यात रात्रभर रंगणाऱ्या या पब संस्कृतीवर नियंत्रण कोणाचे आहे? पुणे विद्येचे माहेरघर समजले जाते. मात्र, आता ते ड्रग्ज व अवैध धंद्यांचे केंद्र बनले आहे. या शहरातील ससून रुग्णालय विविध उपचारांसाठी प्रसिद्ध होते. ते आता गुन्हेगारांचे आश्रयस्थान बनले आहे. एखादा शासकीय अधिकारी दोषी आढळला की, त्याचे निलंबन केले जाते, पण काही दिवसांनंतर तो पुन्हा त्याच पदावर रुजू झालेला दिसतो. सरकारच्या या कार्यपद्धतीमुळे सामान्य नागरिकही या भ्रष्ट कारभाराविरोधात आवाज उठविण्यास तयार नाहीत. सरकार भ्रष्ट अधिकाऱ्यांना पाठीशी घालत असेल तर सामान्यांच्या आंदोलनाला काही अर्थ राहत नाही. ससूनमधील डॉ. अजय तावरे याला याआधी निलंबित केले होते. आता अग्रवाल यांच्या मुलाच्या रक्ताचे नमुने बदलल्याप्रकरणी त्याच्यावर पुन्हा निलंबनाची कारवाई करण्यात आली. एकाच व्यक्तीचे दोनदा निलंबन होत असेल तर त्याला कायमचे घरी का बसवले जात नाही? असे भ्रष्ट अधिकारी पुन्हा आपल्या खुर्चीत स्थानापन्न होऊन भ्रष्टाचाराची मोठी साखळी निर्माण करतात. नेत्यांच्या पाठबळामुळे हे अधिकारी दिवसेंदिवस मुजोर होत चालले आहेत. आपल्याला मिळणाऱ्या हप्त्यातील ठराविक हिस्सा हे अधिकारी त्यांना पाठीशी घालणाऱ्या नेत्यांपर्यंत पोचवत असतात. पूर्वी सरकारचे प्रशासनावर नियंत्रण असायचे. आता प्रशासनच सत्ताधाऱ्यांवर नियंत्रण ठेवून आहे. त्याचे कारण म्हणजे हप्तेखोरीतून मिळणारा मलिदा. डॉ. तावरेला पोलिसांनी ताब्यात घेताच त्याने या प्रकरणातील अनेकांची नावे उघड करण्याचा इशारा दिला. त्याची मात्रा बहुधा बरोबर लागू पडलेली दिसते. त्यामुळेच दोनदा दोषी आढळूनही त्याच्यावर कारवाईऐवजी निलंबन करण्यात आले. निलंबन म्हणजे विनाविलंब पुन्हा कामावर रुजू करून घेणे, अशी सरकारी व्याख्या झाली आहे. आमदार धंगेकर, अंधारे यांनी राजकीय हेतूने आरोप केले असले, तरी त्यांनी पुण्यातील उत्पादन शुल्क विभागाचा शोधून काढलेला भ्रष्ट कारभार, हप्तेखोरी सरकारला नाकारता येणार नाही. देसाईंनी व्यक्तिगत आरोप दुर्लक्षित करून आपल्या विभागात कशा प्रकारे भ्रष्टाचार बोकाळला आहे, याची गंभीर दखल घ्यायला हवी. आमदार धंगेकर व अंधारे यांना माफी मागण्यासाठी त्यांनी जो ७२ तासांचा कालावधी दिला आहे तसाच कालावधी उत्पादन शुल्क कार्यालयातील अधिकाऱ्यांना या प्रकरणात होणाऱ्या कारवाईबाबत द्यावा. पुण्यात साहित्यिक, संस्कृतीऐवजी आता पब व ड्रग्ज संस्कृती वाढीस लागली आहे. एकेकाळी शिक्षणाचे माहेरघर समजले जाणारे पुणे आता ड्रग्जच्या कारखान्यांसाठी प्रसिद्ध झाले आहे. पुण्यात देश–विदेशासह अनेक विद्यार्थी ज्ञानार्जन करण्यासाठी येतात. त्यांच्या पालकत्वाची जबाबदारी शासन व प्रशासनाची आहे. मात्र, शासनच येथील गुन्हेगारीला पाठीशी घालून त्यांना पाठबळ देत असेल तर विद्येच्या या प्रांगणात डॉक्टर, इंजिनिअर व अधिकारी घडण्याऐवजी गुन्हेगारांच्या टोळ्या निर्माण होतील. मंत्री देसाई यांनी विरोधकांना आव्हान देण्याऐवजी उत्पादन शुल्क विभागातील भ्रष्टाचाराचे निर्मूलन करण्याचे आव्हान स्वीकारावे. कारण पुण्याचे पालकत्व स्वीकारणारे अजित पवार या प्रकरणात अद्याप मूग गिळून आहेत.

प्रशांत बाफना

# आयुष्य साजरं करणारा देश

लोकनेता न्यूज नेटवर्क



मी कल्चरल इंटेलिजन्स (सर्जनांक नाही) या विषयाची अभ्यासक आहे. त्यामुळे एखादा देश किंवा तिथली संस्कृती उलगडून पाहताना फक्त खाद्यसंस्कृती, पेहराव, दिसणं, संगीत, साहित्य यावरून त्या देशाकडे पाहत नाही. ब्राझीलला अनुभवताना त्याहून अधिक काही हाती गवसलं, त्याबद्दल बोलायचंय. फार मोठी उदाहरणं नको घेऊ या. थोडं ब्राझीलमधल्या रोमान्सबद्दल बोलू या. इथले मोटेल्स हा एक मजेदार विषय आहे. जागोजागी मोटेल्स दिसतील तुम्हाला. आपल्याकडे ओयो हॉटेल्स रूम बदनाम आहेत, पण मोटेल्स बदनाम नाहीत, तर सोयीचे पडतात. बरं इथं ब्युरोक्रॅसी नाही ओळखपत्रांची. दोन सज्ञान व्यक्ती खुशीने जाऊ शकतात. तिथे मॉरल पोलिस येत नाहीत.इथे केसांना घेऊन एक भली मोठी बाजारपेठ आहे. अनेक इमिग्रन्ट्स आणि आंतरवंशीय लग्नांमुळे पुढच्या पिढीत तुम्हाला केसांचे बरेच टाइप्स पाहायला मिळतात. पार्लर कल्चर खूप लोकप्रिय आहेच. मॅनिक्युअर, पॅडिक्युअर आणि केस ब्लो ड्राय करणे हे आयब्रो करण्याइतकं सोपंय. इथल्या रोमान्समध्ये सुळसुळीत, हेल्दी, खांद्यावरून खाली येणारे, समुद्राच्या लाटांप्रमाणे आणि नदीच्या वळणासारखे केस लक्ष वेधून घेतात. अगदी पन्नास–चाळीस टक्के आफ्रो ब्राझिलियन लोकसंख्यादेखील केसांचे असंख्य प्रॉडक्ट्स वापरते. त्यांची अस्मिता ओळख असलेले 'अँथ्रोपोलॉजिकल ॲफ्रो हेयर टाइप' तलम, मऊसूत होतील आणि केसांना हेलकावे येतील, हा उद्देश. केस सुंदर, निरोगी हवेत म्हणून आबालवृद्ध, स्त्रिया–पुरुष सर्व काळजी घेतात. जसं दिवसातून चार–पाच वेळा दात घासणारे ब्राझिलियन असतात, म्हणजे मॉलच्या रेस्टरूममध्ये असो की, ऑफिसच्या वॉशरूममध्ये प्रत्येक खाण्यानंतर ब्रश करणं मस्ट आहे, तसं केसांची काळजीसुद्धा जणू अस्तित्वाचाच भाग म्हणा ना. काफूने (उरर्षीपश) या शब्दाबरोबर एक संस्कृती उभी राहते डोळ्यासमोर. इथल्या एका सहज सुंदर नजाकत असलेल्या नखऱ्याबद्दल बोलतेय. नखरा म्हणू या की अदा म्हणू या? प्रेमातली एकात्मता म्हणू या हवं तर, ज्यात लय आहे. 'या कुणी छेडिल्या तारा' अशी उत्कटता आहे.'काफूने' हा शब्द मला इथेच समजला. समुद्रकिनारी, बस–मेट्रोत, बागेत, कॅफेटेरियात, पदारीयात (बेकरी) बसल्या बसल्या जोडीदाराच्या केसांमधून हात फिरवणं म्हणजे काफूने. 'मोकळ्या केसांत माझ्या, तू जीवाला गुंतवावे,' असं म्हणू या फारफार तर. ऊळाश्रिश रलीं ष रषषशलींळेप. कुणाचं तरी डोकं मांडीवर घेऊन त्याच्या केसांतून हळुवारपणे हात फिरवणं, इतकं साधं सोपं. फ्रेंच मानववंशशास्त्रज्ञ या शब्दाचे मूळ अंगोलामध्ये आहे असं म्हणतात. मजुरांच्या, गुलामांच्या बोटी तिथून ब्राझीलला येत, तेव्हा त्यांचा हाच एक आपुलकीचा विरंगुळा होता. थकल्या–भागल्या जीवाला आधार. दुसऱ्या मजुराचं डोकं मांडीवर ठेवून त्याच्या केसांतून हात फिरवायचा. या शब्दाबद्दल खूप तात्विक चर्चा झाल्यात. ही कृती कवितांमधून अजरामर झाली आहे.ब्राझीलमध्ये येऊन तुम्ही पास्तेल खाणार नाही असं कसं होईल? आयताकृती आकाराचा हा एक खाद्यपदार्थ. फास्ट फूड म्हणू या आपण. शंभराहून जास्त वर्षे पास्तेलची परंपरा आहे. खाद्यसंस्कृतीचे अभ्यासक म्हणतात की, याचे मूळ थेट विसाव्या शतकात आहे. जपानी निर्वासित कॉफीचे मळे सोडून दक्षिण ब्राझीलमधील शहरांकडे धावले. महायुद्धानंतरचा हा काळ जपानी नागरिकांच्या विरोधातील होता. त्यामुळे जपानी नागरिकांनी व्यवसाय म्हणून उपहारगृहे चालू करताना चिनी पदार्थांचा आसरा घेतला. जपानी चव ब्राझीलमध्ये लोकप्रिय नव्हती. थोडे बदल करून हा आयताकृती पदार्थ तयार झाला. त्याचा आकार बदलला, आतले घटक बदलले पण तंत्र तेच होतं. जेवताना ब्राझिलियन व्यक्ती अन्नाला थेट स्पर्श करीत नाहीत. पिझ्झासुद्धा काट्या–चमच्याने खातील, पण पास्तेल मात्र थेट कढईतून हातात देतात. कागदाच्या नॅपकीनमध्ये ठेवून. याबरोबर उसाचा ताजा रस मिळतो. कधी अननस किंवा मोसंबीचाही असतो.पास्तेल स्ट्रीट फूड आहे. 'फेजोआदा' हा पदार्थ राष्ट्रीय डिश म्हणू शकू. पावभाजी किंवा बिर्याणी बनवताना जशी विविधता आहे, तीच गंमत फेजोआदाची. ही रेसिपी गुलामांनी गुलामांसाठी तयार केली होती. आपल्याकडे राजमा असतो तेच बीन्स, ज्यांना फेजाव म्हणतात. यात सुकलेले बीफचे तुकडे, सॉसेजेस, डुकरांचे काही अवयव आणि स्वयंपाकघरात उपलब्ध असणारं कोणतंही मांस टाकलं जात असे. हा पदार्थ गुलामांसाठी पोटभरीला येत असे. मालकांच्या डायनिंग टेबलवर जे खाल्लं जात नसे, ते सर्व मांस फेजोआदात पडायचं. त्या काळात ब्राझीलमध्ये असणाऱ्या सर्व गुलामांचं हे रोजचं खाद्य होतं. रेसिपीच्या मुळाबद्दल मतमतांतरं आहेत. त्यात पडू या नको. काही संशोधकांच्या मते, पदार्थ गुलामांनी बनवला, पण मालकांसाठी स्ट्यू म्हणून.ब्राझीलमध्ये १७०१ ते १८००मध्ये अंदाजे १.४ दशलक्ष गुलाम आणले गेले, त्यांच्या ५० टक्के उर्वरित आफ्रिकेतून आले. त्याला धरूनच एक म्हण प्रचलित आहे, 'अंगोला नाही तर गुलामी नाही, गुलाम नाही म्हणजे साखर नाही आणि साखरेशिवाय ब्राझील नाही.' या प्रांतातील साल्वादोर पोर्टमध्ये सर्वाधिक गुलामांना आणलं गेलं. त्यामुळे साहजिकच या प्रांतात सर्वाधिक आफ्रो ब्राझिलियन राहतात. आफ्रिकेतील पुरुष गुलाम आणि महिला गुलामांच्या गुणोत्तरात तफावत होती. एका फार मोठ्या व्यक्तीने तेव्हा म्हटलं होतं, 'आम्हाला गुलाम हवेत, मजूर हवेत, पण कुटुंबं नकोत.' काही संशोधकांच्या मते तीन ते पाच गुलाम पुरुषांमागे एक गुलाम महिला असायची. तिला देण्यात आलेले काम पुरुष मजुरांपेक्षा वेगळी असे. मजुरांसाठी स्वयंपाक बनवणं, मालकांच्या मुलांना सांभाळणं, घरकाम करणं, उमरावांच्या घरी मोलकरीण म्हणून काम करणं, रस्त्यावर खाद्यपदार्थ विकणं ही कामं त्या करत. या महिला गुलामांना पुरुषांप्रमाणे शारीरिक त्रासाला सामोरं जावं लागत नव्हतं कारण त्या मालकांच्या घरात काम करत. लहान मुलांची काळजी घेत. वृद्धांची सेवा करत. त्यांना पुरुषांपेक्षा जास्त स्वातंत्र्य होतं.पोर्तुगीज व्यापाऱ्यांपेक्षा गुलामांनी त्यांची खाद्यसंस्कृती ब्राझीलमध्ये रुजवली. देन्जे तेल मात्र पोर्तुगीज घेऊन आले. इंधन म्हणून पोर्तुगीजांना याचा वापर करायचा होता, पण वर्षभरात आफ्रिकन गुलामांनी देन्जे तेल त्यांच्या स्वयंपाकघरात वापरायला सुरुवात केली. त्याचा उपयोग ते आधीही करत होते. मालागुएता मिरची आफ्रिकेतून ब्राझीलमध्ये आली, तसेच नारळाचे दूध हे पूर्णपणे आफ्रिकन खाद्यसंस्कृतीचा घटक नसले तरी आफ्रिकन गुलाम महिलांनी त्याचा वापर करून रेसिपी विकसित केली. आज नारळ ब्राझीलचा अविभाज्य घटक आहे. नारळाचे दूध म्हटलं की मोकेका ही डिश आठवते. जी आपल्याकडे गोव्यातदेखील प्रसिद्ध आहे.इथे मला कोथिंबिरीची एक आठवण सांगायचीय. मी भारतीय पद्धतीने काही बनवलं तर माझ्या रिओतल्या एका शेजारणीला नेऊन देत असे. त्यावर ताजी मनमोहक कोथिंबीर पेरून टाकायचे. पण एकदा ती म्हणाली, 'तू यावर कोथिंबीर टाकून देऊ नकोस कारण कोथिंबीर आफ्रो ब्राझिलियन लोकांना आवडते' आणि ही शेजारीण व्हाइट ब्राझिलियन होती. ब्राझिलियन खाद्यसंस्कृतीबद्दल बोलायचं झालं तर एक लेखमाला होईल. जाता जाता 'कसावा' या कंदमुळाबद्दल सांगायलाच हवं. अगदी कोलंबसाला जेव्हा कसावाच्या उपयुक्ततेबद्दल समजलं तेव्हा त्याने कसावा ब्रेड घेऊन प्रवास केला होता. आपण जशा विविध सुक्या चटण्या पानात डाव्या बाजूला वाढतो तसं 'फारोफा' म्हणून एक सुकी दाणेदार चटणी खायला ब्राझिलियन्सना आवडते.आपल्याकडे जशी दिवाळीला साफसफाई, डेकोरेशन, रंगरंगोटी असते तसं इथे नाताळसाठी (आम्ही नाताल असं म्हणतो.) सांता क्लॉज आमच्याकडे पपाय नोएल बनून येतो. शॅम्पेनच्या, वाइनच्या बाटल्यादेखील या सजावटीतून सुटत नाहीत. या बाटल्यांना लावायला ॲप्रन्स बनवले जातात. शिवणकाम, भरतकाम यावर विशेष प्रेम असणारा हा देश. गॅसच्या सिलिंडरला आणि टॉयलेटच्या सीटलाही कव्हर करतो.फेस्ता जुनिना हा जून महिन्यात साजरा होणारा हा सण गावोगावी भरणाऱ्या जत्रांसारखा असतो. शेतकरी राजाचा हा सण. चौकडीचे शर्ट घातले जातात. शेतकऱ्यांप्रमाणे, डोक्यावर हॅट, बायकांचे फुग्याफुग्याचे, झालरीचे फ्रॉक्स प्रामुख्याने लाल, हिरव्या, निळ्या अशा भडक रंगांचे. रिबिनी वाटतील अशा गोंड्यांनी बांधलेले केस असं चित्र जून महिन्यात आजूबाजूला दिसतं. फेस्ता जुनिनात खाद्यपदार्थांचे स्टॉल्स लागतात. यात पारंपरिक पदार्थ असतात.जगभरात ३१ डिसेंबरची धूम असते. पार्ट्या चालतात. रिओ शहर तर जगाचं पार्टी कॅपिटल. इथे कोपाकबाना समुद्रकिनारी आतषबाजी होते. संजय लीला भन्साळीच्या 'हम दिल दे चुके सनम'च्या शेवटच्या दृश्यात होती, तशी आतषबाजी. ही पाहण्यासाठी जगभरातील पर्यटक येतात. येमेन्जा किंवा जनाय्ना ही समुद्राची देवी. जलदेवता. तिच्यासाठी एक पूजा केली जाते. पांढरे शुभ्र वस्त्र घालून समुद्रात बोटी घेऊन जातात. सामान्य नागरिकही ३१ डिसेंबरच्या संध्याकाळी पांढरी वस्त्रं घालतात. हातात रंगीत फुलं घेतात. लाल, हिरवा, पिवळा, गुलाबी, पांढरा अशा विविध रंगांची फुलं विकायला असतात. मनात जी इच्छा–आकांक्षा, त्या रंगाचे फूल समुद्राला वाहायचे. आपण जसं नारळ अर्पण करतो तसं. याशिवाय जर तुम्हाला काही वस्तू हवी असल्यास तिची कागदी प्रतिकृतीसुद्धा वाहिली जाते. या दिवशी संध्याकाळी पेगवर दारू मिळते फिरत्या विक्रेत्यांकडे. रात्रभर लोक समुद्रावर थांबतात. पोलिस गस्त असतेच. या दिवशी लाखोंच्या संख्येने गर्दी होते म्हणून ठरावीक मर्यादेपर्यंतच खास तिकिटं विकली जातात. त्यासाठी भल्यामोठ्या रांगा असतात. एक जानेवारीच्या भल्या पहाटे केशरी रंगातले सफाई कामगार समुद्रकिनारा स्वच्छ करायला घेतात. साताठ वाजायच्या आधी किनाऱ्यावरच्या बाटल्या, कचरा उचलला जातो. बिअरचे कॅन उचलणारी माणसं वेगळी असतात. भंगार गोळा करणारे हे कॅन रिसायकल करण्यासाठी नेतात. ही एक मोठी बाजारपेठ आहे इथे.असा हा देश रोजचा दिवस उत्सव असल्यासारखा समरसून जगणारा. सगळं आयुष्य साजरा करणारा.


# उदगीरचे समर्पण क्लासेसने राष्ट्रीय पातळीवर NEET परीक्षा मध्ये रचला इतिहास;प्रा.अविनाश पाटील यांचे सर्व स्तरातून अभिनंदन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

उदगीर । सुनिल बस्वराज हावा









उदगीर येथिल विद्यार्थ्यांमध्ये जिद्द आत्मविश्वास आणि अथक परिश्रमाचे बीज पेरनाऱ्या समर्पण करिअर इन्स्टिट्यूटने बोर्ड पाठोपाठ राष्ट्रीय पातळीवरील वैद्यकीय प्रवेश परीक्षा छएएढ मध्ये यशाचे उंच शिखर गाठून आपल्या उदगीरचा समर्पण पॅटर्न तयार केला आहे. हा पॅटर्न तयार करून समर्पण करिअर इन्स्टिट्यूट उदगीरच्या विद्यार्थ्यांची पहिली पसंद ठरत आहे. फक्त सात विद्यार्थ्यांची बॅच घेवून त्यापैकी चार विद्यार्थी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएस प्रवेशास व दोन विद्यार्थी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात बीएएमएस प्रवेशास पात्र झाले आहेत. त्यापैकी अनुराग विठ्ठलराव भोसले या विद्यार्थ्याने ६२५ गुण घेवून उदगीर तालुक्यामधुन प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. आरक्षित प्रवर्गातुन गायत्री कांबळे ५५३ गुण, अविनाश सुवर्णकार ५३४ गुण तर रितेश तुंकलवाड ४४४ गुण घेऊन घवघवीत यश संपादन केले आहे.

नीट परीक्षा म्हटलं की विद्यार्थी लातूर, नांदेड, हैदराबाद, कोटा अशा ठिकाणी जाऊन या परीक्षेची तयारी करतात परंतु आपल्या उदगीरचं आपलं ब्रँड असलेल्या समर्पण करिअर इन्स्टिट्यूटने सिद्ध करून दाखवलं की पुर्णवेळ उदगीर मध्ये राहून या राष्ट्रीय पातळीवरील परीक्षेतून शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळवता येतो. या यशाबद्दल समर्पण करिअर इन्स्टिट्यूट उदगीरचे कौतुक व अभिनंदन मा. नगराध्यक्ष राजेश्वरजी निटुरे, ग्राम विकास मंत्रालयाचे कक्ष अधिकारी मा.अच्युत इप्पर, नाशिकचे अप्पर पोलीस अधीक्षक मा. अनिकेत भारती, भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमोल निडवदे, डॉ. नामदेव नरवाडे यांनी केले आहे.

या यशासाठी समर्पण करिअर इन्स्टिट्यूट उदगीरचे संचालक प्रा. अविनाश पाटील, प्रा. सुनिल ढगे, प्रा. पांडुरंग फड, प्रा. विकास पाटील, प्रा. राधाकिशन जाधव, प्रा. पवन नलाबले, प्रा. श्रीदेवी पाटील व सर्व समर्पण टीम ने अथक परिश्रम घेतले आहे.

# नादसंगम फ्युजन कार्यक्रम संपन्न



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

अहमदनगर । प्रतिनिधी

विचार भारती व उत्कर्ष फाउंडेशन आयोजित.अहिल्यादेवी होळकर सांस्कृतिक महोत्सवात नादब्रह्म संगीतालय, प्रस्तुत. पवन श्रीकांत नाईक निर्मित नादसंगम-फ्युजन हा मराठी, हिंदी, पंजाबी व ब्रज भाषेतील प्रसिद्ध गीतांची मैफल संपन्न झाली त्यास प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला यावेळी माजी महापौर बाबासाहेब वाकळे,निमंत्रक बलभीम पठारे,सुधीर लांडगे,अनिल मोहिते आदी उपस्थित होते .. या कार्यक्रमात विशेष सहभाग सरोज पालडीया यांचा होता यामध्ये साथसंगत करणारे कल्याण मुरकटे व पवन नाईक (संवादिनी),स्मिता राणा(सतार),महेश लेले(व्हायोलिन), कुलदीप चव्हाण(बेंजो),शेखर दरवडे(तबला), रुद्र कुलकर्णी(डर्बूके व काहून),प्रणव देशपांडे (सिंथेसाईझर)होते तर सहवादक-अनुज दरवडे,सहगायक-श्रेयस शिंत्रे,नवरतन वर्मा,पवन तळेकर,विजय जाधव,निनाद पारखी,मुलांशू परदेशी व संकेत गांधी हे होते तर निवेदक सुनील मधुकर कात्रे यांनी केले .मैफलिची सुरुवात महिला सबलीकरण या आशेचे प्रत्युषा(एक नवी पहाट)हे मराठी भाषेतील गीताने झाली.हे गीत अहिल्यानगरचे कवी संजोग धोत्रे यांनी लिहीले व संगीत पवन नाईक यांचे होते.ब्रज भाषेतील अहीर भैरव रागातील पारंपारिक बंदिश अलबेला सजन आयोरी या रचनेत नाईक सरांबरोबर सरोज पालडीया गायिकेने रंगत भरली.मिराबाईंची रचना सासोंकी मालाने प्रभू राम व कृष्ण दर्शन घडविले.सिंधी-पंजाबी भाषेतील झूलेलाल गीत बैरागी राग गीताने हिंदूस्तानी सिंधु संस्कृतीच्या स्मृती उजागर केल्या.अहिल्यादेवींची आठवण व कार्य कर्तृत्वाची जाण देत तेरे वाजो ह्या गीताने मैफलिची सांगता झाली.

## हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने देण्यात आल्या शुभेच्छा

# दक्षिण आफ्रिकेतील कॉम्रेड्स मॅरेथॉनसाठी जाणाऱ्या शहरातील धावपटूंचा सत्कार

## नगरचे धावपटू दक्षिण आफ्रिकेतही शहराचे नाव उंचावतील-संजय सपकाळ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

अहमदनगर । प्रतिनिधी



जगातील सर्वात जुनी व अवघड असणाऱ्या दक्षिण आफ्रिकेतील कॉम्रेड्स मॅरेथॉनसाठी रवाना होणारे शहरातील धावपटू गौतम जायभाय, योगेश खरपुडे, जगदीप मक्कर व रवी पत्रे यांचा हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने सत्कार करुन मॅरेथॉनसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

भिंगारच्या भगवान गौतम बुध्द जॉगिंग पार्क येथे हरदिनचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ यांनी धावपटूंचा सत्कार केला. यावेळी संजय सपकाळ, दिलीपराव ठोकळ, सुमेश केदारे, मनोहर दरवडे, दीपक धाडगे, अविनाश पोतदार, अशोकराव पराते, अविनाश जाधव, सर्वेश सपकाळ, सचिन चोपडा, सुभाष पेंढुरकर, रमेश वराडे, विकास भिंगारदिवे, नामदेवराव जावळे, अशोक दळवी, जालींदर अळकुटे, नवनाथ वेताळ, अभिजीत सपकाळ, अशोक लोंढे, सखाराम अळकुटे, सुंदरराव पाटील, विलासराव तोतरे, विठ्ठल राहिंज, राजू कांबळे, आसाराम बनसोडे, एकनाथ जगताप, शेषराव पालवे, दिनेश शहापूरकर, दिलीप बोंदर्डे, विशाल बोगावत, संतोष लुणिया, रमेश कोठारी, कुमार धतुरे, रुपेश झोडगे, रामदास घडसिंग, प्रकाश भिंगारदिवे, विकास निमसे, अजय खंडागळे, शिवांश शिंदे, भाऊसाहेब गुंजाळ, आदिनाथ वैराळ, विशाल भामरे, उंडे मेजर, भरत डंगोरे आदी उपस्थित होते.

संजय सपकाळ म्हणाले की, शहरात खेळातून आरोग्याप्रती जागरुकता निर्माण होत आहे. नागरिकांचा देखील मैदानावर येण्याचा कल वाढत आहे. निरोगी व सदृढ आरोग्यासाठी मैदानी खेळाची गरज निर्माण झाली आहे. जागतिक दर्जाच्या मॅरेथॉन स्पर्धेत नगरचे धावपटू शहराचे नाव उंचावणार असल्याचा विश्वास व्यक्त केला.

यावेळी उपस्थित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, छावणी परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे, उद्योजक गौरव फिरोदिया व अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे यांनी धावपटूंना कॉम्रेड्स मॅरेथॉनसाठी शुभेच्छा दिल्या.

कॉम्रेडस मॅरेथॉन स्पर्धा डर्बन ते पिटर्स मॅरिअटझबर्ग या दोन शहराच्या ८६ किलोमीटरच्या खडतर अंतरादरम्यान होणार आहे. यामध्ये भारत देशातूनही मोठ्या संख्येने धावपटू सहभागी होणार आहेत. खरपुडे, मक्कर, जायभाय हे जिल्ह्यासाठी प्रथमच स्पेशल बॅक टू बॅक कॉम्रेड्स फिनीशर पदक आणण्याचे स्वप्न घेऊन जात आहेत. त्यांनी २०२३ ला मॅरेथॉन पूर्ण करून मेडल मिळवले होते. कॉम्रेड्स मॅरेथॉनला सलग दोन वर्ष सहभाग नोंदविल्यास स्पेशल प्रिसिएशन मेडल दिला जातो. सोबत रवी पत्रे हे त्यांच्या पहिल्या मॅरेथॉनसाठी जात आहेत. या स्पर्धेत चांगली कामगिरी करण्याचा संकल्प चारही धावपटूंनी व्यक्त केला.या मॅरेथॉन स्पर्धेला वैभवशाली इतिहास असून, १९२१ मध्ये ही स्पर्धा घेण्यात आली. दरवर्षी ही स्पर्धा पहिल्या महायुध्दातील सैनिकांच्या स्मृती प्रित्यर्थ घेण्यात येते. या मॅरेथॉनचे हे ९७ वे वर्ष आहे. शारीरिक क्षमतेचा कस लावणाऱ्या व कमी-अधिक तापमानाचा मोठा प्रभाव असलेल्या या स्पर्धेत रनर्सला स्वत:ला सिध्द करावे लागणार आहे.

# मुंबईत पुढील ४ दिवस कोसळणार पाऊस मराठवाडा, विदर्भातही पावसाची शक्यता

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

मुंबईसह उपनगरात पुढील ४ दिवस पावसाची शक्यता आहे. याशिवाय येत्या २४ तासांत मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. राज्यातील काही ठिकाणी तापमानाचा पारा चाळीशीच्या पुढे गेला आहे. त्यामुळे नागरिकांना प्रचंड उकाड्याचा सामना करावा लागतोय. मात्र आता पुन्हा एकदा राज्यात पावसाची शक्यता असल्याने मिळण्याची शक्यता आहे.पहाटेपासून उकाड्याची जाणीव होत असल्याने मुंबईकर हैराण झाले आहेत. दरम्यान, पुढील तीन-चार मुंबईसह उपनगरात ढगाळ वातावरण राहण्याचा अंदाज आहे. त्याचबरोबर आजपासून ४ दिवस हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांना देखील पावसाचा इशारा देण्यात आला आहे.भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार, येत्या २४ तासांत मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. पुणे, रत्नागिरी, रायगड, कोकण, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यांत पावसाचा अंदाज आहे. अहमदनगर, नाशिक, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धुळे, नंदुरबार, पालघर, ठाणे जिल्ह्यातही पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.दरम्यान, मान्सूनबाबत देखील एक महत्वाची अपडेट समोर आली आहे. पुढील तीन ते चार दिवसांत केरळमध्ये मान्सून दाखल होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. केरळमध्ये मान्सूनसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होत असल्याची माहिती हवामान खात्याने दिली आहे. तर महाराष्ट्रात जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मान्सूनचे आगमन होण्याचा अंदाज आहे.याशिवाय जून महिन्यात विदर्भ आणि मराठवाड्याच्या तुलनेत कोकण आणि दक्षिण महाराष्ट्रात पावसाचा जोर जास्त राहण्याचा अंदाज आहे. जूनमध्ये एल-निनो निष्क्रिय अवस्थेत जाईल. जुलै ते सप्टेंबर या काळात ला-निना स्थिती सक्रिय होईल. याचा परिणाम म्हणून जून ते जुलै या पहिल्या टप्प्यापेक्षा ऑगस्ट ते सप्टेंबर या मोसमी पावसाच्या दुसऱ्या टप्प्यात अधिक पाऊस पडण्याचा अंदाज आहे. १० ते १२ जूनला मुंबईत पावसाचे आगमन होणार, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.



# आयुष्यमान भारत योजना विकास प्रक्रीयेचा भाग-ना.विखे पाटील






■ लोकनेता न्यूज नेटवर्क

अहमदनगर । प्रतिनिधी

आरोग्य क्षेत्रात मोठी गुंतवणूक करून पायाभूत सुविधा अधिक बळकट करण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशामध्ये सुरू आहे.आयुष्यमान भारत योजनेची अंमलबजावणी विकास प्रक्रियेचा भाग असल्याचे प्रतिपादन महसूल तथा पालक मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.शहरातील दिनदयाळ प्रतिष्ठान परीवार,दिनदयाळ नागरी सहकारी पतसंस्था आणि सुरभी रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या सर्वरोग निदान शिबीराचे उद्घाटन मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आले.जिल्हा संघचालक वाल्मिक कुलकर्णी पंतसंस्थेचे चेअरमन वसंत लोढा सुरभी रुग्णालयाचे चेअरमन अनिरूध्द देवचक्के माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.पतसंस्थेने सभासदांकरीता सुरू केलेल्या हेल्थ कार्ड योजनेचा शुभारंभ यानिमिताने करण्यात आला.या उपक्रमाबद्दल मंत्री विखे पाटील यांनी संस्थेच्या सर्व पदाधिकार्याचे अभिनंदन करून आज आरोग्य सुविधेचा वाढत्या खर्चाचे सर्वात मोठे आव्हान समाजासमोर आहे.यासाठी आयुष्यमान भारत योजना सुरू करून यामाध्यमातून पाच लाख रुपयांपर्यत मोफत उपचार देण्याची अंमलबजावणी होत आहे.राज्य सरकारने महात्मा फुले जनआरोग्य योजना सुरू त्यामध्येही सर्व अटी काढून पाच लाख रुपयांपर्यत उपचार मोफत देण्यात येतील.यामध्ये काही ग्रामीण भागातील रूग्णालय चालकांनी बेडची अटीमध्ये बदल करण्याच्या केलेल्या मागणीबाबत राज्य सरकार निश्चित विचार करेल असे विखे पाटील म्हणाले.देशात आज आरोग्य सुविधला विकासाचा भाग बनविण्यात आले असून आरोग्य सुविधेला बळकटी देण्यासाठी मोठी गुंतवणूक होत असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

# हिंगोली लोकसभा मतदार संघातून आष्टीकर पाटील नागेश बापूराव विजयी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

हिंगोली | सय्यद रहीम रजा

१५- हिंगोली लोकसभा मतदार संघातून आज शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे उमेदवार आष्टीकर पाटील नागेश बापूराव हे १ लाख ८ हजार ६०२ मतांनी विजयी झाल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी जितेंद्र पापळकर यांनी घोषित करत त्यांना विजयाचे प्रमाणपत्र प्रदान केले. यावेळी विशेष मतमोजणी निरीक्षक श्रीमती एम. एस. अर्चना, एम. पी. मारोती, अपर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी, उप जिल्हा निवडणूक अधिकारी रामेश्वर रोडगे यांच्यासह निवडणूक यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते.

विजयी उमेदवार श्री. आष्टीकर यांनी २६ व्या फेरीअखेरीस टपाली मतदानासह त्यांना ४ लाख ९२ हजार ५३५ मते मिळाली. त्यांचे प्रतिस्पर्धी उमेदवार दुस-या क्रमांकावर बाबुराव कदम कोहळीकर यांना ३ लाख ८३ हजार ९३३ मते मिळाली. तर तिस-या क्रमांकावर वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डॉ. बी. डी. चव्हाण यांना १ लाख ६१ हजार ८१४ मते मिळाली.

गजानन धोंडबा डाळ (बहुजन समाज पार्टी) यांना ७,४६५, विजय रामजी गाभणे (कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्ससिस्ट) यांना १४,६४४, अनिल देवराव मोहिते (अखिल भारतीय परिवार पार्टी) यांना ३,३७४, ड. अलताफ अहेमद (इंडियन नॅशनल लीग) यांना २,९५०, देवसरकर वर्षा शिवाजीराव (बहुजन मुक्ती पार्टी) यांना ४,०९९, देशा श्याम बंजारा (समनक जनता पार्टी) यांना २,०६३, प्रकाश मेशराम रणवीर (रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया-ए) यांना २,१०२, रवी रामदास जाधव-सवनेकर (अभिनव भारत जनसेवा पक्ष) यांना १,६०२, सुनिल दशरथ इंगोले (भीमसेना) यांना १,०२७, हेमंत राधाकिशन कनाके (राष्ट्रीय किसान बहुजन पार्टी) यांना १,८००, त्रिशला मिलिंद कांबळे (बहुजन समाज पार्टी-आंबेडकर) यांना २,१५०, अशोक पांडुरंग राठोड (अपक्ष) यांना २,९०६, आनंद राजाराम धुळे (अपक्ष) यांना ९,८१७, अंबादास सुकाजी गाडे (अपक्ष) यांना १४,७४२, अ. कदिर मस्तान सय्यद



(गोरेगावकर) (अपक्ष) यांना ३,७१३, दत्ता श्रीकृष्ण सूर्यवंशी (अपक्ष) यांना ७,२३९, देवजी गंगाराम आसोले (अपक्ष) यांना १,४८३, बाबुराव आनंदराव कदम (अपक्ष) यांना ४,४८२, भवर गोविंदराव फुलाजी (अपक्ष) यांना २,१४६, महेश कैलास नप्ते (अपक्ष) यांना २,२९९, ड. रवि शिंदे (अपक्ष) यांना २,७०१, रामप्रसाद नारायण बांगर (अपक्ष) यांना ४,५२५, ड. रामराव आत्माराम जुंबडे (अपक्ष) यांना २,१०३, वसंत किसन पाईकराव (अपक्ष) यांना ५९३, विजय ज्ञानबा राऊत (अपक्ष) यांना १,१२६, विश्वनाथ भाऊराव फाळेगावकर (अपक्ष) यांना १,८५९, ड. शिवाजीराव जाधव (अपक्ष) यांना २,२१४, सत्तार पठाण (अपक्ष) यांना २,४६३, सर्जेराव निवृत्ती खंदारे (अपक्ष) यांना ५,०१४आणि सुनिल मोतीराम गजभार (अपक्ष) ३,१९२ यांना तर नोटाला २६ व्या फेरीअखेरीस टपाली मतदानासह ३,१२३ मतदारांनी पसंती दर्शविली असून ११ लाख ५९ हजार २९८ मते वैध ठरली आहेत. अवैध मते ४४६ आणि १५ टेंडर्ड मते पडली असल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी जितेंद्र पापळकर यांनी घोषित केले आहे.

या निवडणूक प्रक्रियेत जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र पापळकर, पोलीस अधीक्षक जी. श्रीधर, सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी श्रीमती मेघना कावली, अपर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती अर्चना पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी रामेश्वर रोडगे, सहायक निवडणूक अधिकारी क्रांति डोंबे, डॉ. सखाराम मुळे, डॉ. सचिन खल्लाळ, अविनाश कांबळे, उपजिल्हाधिकारी समाधान घुटुकडे, उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक यांच्यासह सर्व पथकप्रमुख सहभागी झाले होते. १५- हिंगोली लोकसभा मतदारसंघासाठी दुसऱ्या टप्प्यात म्हणजे २६ एप्रिल २०२४ रोजी मतदान पार पडले होते.

# पुरोगामी युवा ब्रिगेडचे बांधकाम विभागात ठिय्या आंदोलन

## उमरखेड-हरदडा रस्त्याचे संथ गतीने सुरू आहे काम



**तर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करणार**

उन्हाळ्यात सुरु केलेले काम अद्याप पूर्ण नाही. पावसाळ्यापूर्वी च रस्त्याचे काम व्हायला पाहिजे होत. बांधकामासाठी आजूबाजूला टाकलेली माती पावसामुळे रस्त्यावर येऊन गाडी घसरुन अपघात होण्याची शक्यता आहे. खड्ड्यांमुळे किंवा हलगर्जी पणामुळे अपघातात झाला व मोठी दुखापत झाली तर संबंधित बांधकाम विभागाच्या इंजिनीयर वर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करु

**शाहरूख पठाण,प्रवक्ता,पुरोगामी युवा ब्रिगेड**

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

उमरखेड | सय्यद रहीम रजा

मागील दोन महिन्यांपासून उमरखेड हरदडा रस्त्याचे काम संथ गतीने सुरू असून काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्यामुळे काल पुरोगामी युवा ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात धडक देत ठिय्या आंदोलन केले.

कामाला सुरुवात ही दोन महिन्यापूर्वीच झाली होती. या दोन महिन्यात कमीत कमी विडूळ पर्यंत तरी रस्ता व्हायला पाहिजे होता. रोड वरच गावंडे महाविद्यालय, शाळा आहेत. सुट्ट्या संपणार आहेत त्यामुळे विध्यार्थी मोठ्या प्रमाणात ये जा करणार आहेत. लवकरच पावसाला सुरुवात सुद्धा होणार आहे. त्यामुळे कामात व्यत्यय येण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही बाब बांधकाम विभागाला अधिच लक्षात यायला पाहिजे. कुठलेच नियोजन न करता कामाला सुरुवात करण्यात आली. पावसामुळे खोदलेल्या खड्ड्यामध्ये पाऊसाचे पाणी साचून आजूबाजूला रस्त्यावर चिखल तयार होऊ शकतो यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.यावेळी जिल्हाध्यक्ष शिवशंकर सुरोशे , भागवत सूर्यवंशी, परमेश्वर रावते, सागर शेरे , अनिल हरणे, मनोज धुळध्वज, सिद्धार्थ मूनेश्वर , विक्रम जाधव, आश्विन राठोड, योगानंद जाधव,अंबादास गव्हाळे, नागराज दिवेकर, अमर लोमटे, मुक्तार शाह, लक्ष्मण बेंडके, ज्ञानेश्वर ठाकरे, ताहेर शाह, दत्ता दिवेकर, सिराज खान, आकाश लोमटे,संदीप मवाडे, माजित पठाण, शेख सोहेल, ऋषिकेश वानखेडे, आम्ले महाराज, गजानन अगोशे,आकाश पांडे, शंकर गुंडेकर आदि उपस्थित होते.

# उदगीर नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने जागतिक पर्यावरण दिनापासून वृक्षारोपण मोहिमेस सुरुवात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

उदगीर | सुनिल बस्वराज हावा

उदगीर येथे दिनांक ०५ जून २०२४ रोजी, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर- घुगे यांच्या मार्गदर्शनाने यावर्षी लातूर जिल्हाभर माहे जून ते ऑगस्ट दरम्यान वृक्षारोपण मोहिम राबविण्यात येत आहे. उदगीर नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने मुख्याधिकारी सुंदर बोंदर प्रशासक सुशांत शिंदे यांच्या संकल्पनेतून उदगीर नगरपरिषद कार्यक्षेत्रांतर्गत खुल्या जागा, मैदान, उद्यान या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्याचा निर्धार आहे.

याची सुरुवात आज जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आनंदनगर पाण्याची टाकी परिसरामध्ये मुख्याधिकारी सुंदर बोंदर यांच्यासह उपस्थित अधिकारी कर्मचारी, परिसरातील नागरिक यांच्या शुभहस्ते विविध फळझाडे व सावली देणारे वृक्ष लावून करण्यात आली.



नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने उदगीर शहरातील नागरिक, व्यापारी, समाजसेवी संस्था, गणेश मंडळ, मित्रमंडळ यांना जाहीर आवाहन करण्यात येते आहे की, आपण आपले घर अंगण, परिसर, परसबाग, खुली जागा इत्यादी ठिकाणी प्रती कुटुंब एक झाड याप्रमाणे वृक्ष लागवड चळवळीत सक्रिय सहभाग नोंदवावा. त्याचप्रमाणे पावसाचे पडणारे पाणी जमिनीत मुरवावे या हेतूने रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रत्येक नागरिकांनी आपल्या घराच्या छतावरील पाणी जमिनीच्या गर्भात मुरेल या दृष्टिकोनातून प्रयत्न करावे असे आवाहन करण्यात येत आहे.सदर वृक्षारोपण मोहिम यशस्वी करण्यासाठी नगरपरिषदेचे उपमुख्याधिकारी सतिश बिलापट्टे यांच्या सह वृक्षविभाग, स्वच्छता विभाग, एनयुएलएम विभागाचे अधिकारी कर्मचारी यांनी मेहनत घेतली.

# रावेर लोकसभा निवडणुकीत रक्षा खडसेनी मारली हेट्रिक;मलकापूर विजय उत्सव साजरा

## मा.आमदार चेंनसुख संचेती याच्या अथक प्रयत्नांना यश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

अनिलकुमार गोठी | मलकापूर

रावेर लोकसभा मतदारसंघात भाजपच्या उमेदवार रक्षा खडसे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार श्रीराम पाटील यांच्यात थेट लढत झाली. या मतदारसंघात रक्षा खडसे गेल्या १० वर्षांपासून भाजपच्या खासदार आहेत. विशेष म्हणजे रक्षा खडसे यांना यावेळी विजयाची हॅटट्रीक करण्यात यश आलं आहे.रावेर लोकसभा मतदारसंघात भाजपच्या विद्यमान खासदार रक्षा खडसे यांना मोठं यश आलं आहे. रक्षा खडसे यांचा तब्बल २ लाख २९ हजार ८७९ मतांनी विजय झालाय. रक्षा खडसे यांना या निवडणुकीत ५ लाख ४५ हजार ५९२ मते मिळाली आहेत. तर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार श्रीराम पाटील यांना ३ लाख १५ हजार ७१३ मते मिळाली आहेत. रक्षा खडसे यांची या निमित्ताने विजयाची हॅटट्रीक झाली आहे. निवडणूक काळात रक्षा खडसे यांच्याबाबत पक्षांतर्गत नाराजी असल्याच्या चर्चा समोर आल्यानंतर भाजपची

धाकधूक वाढली होती. पण सलग तिसऱ्यांदा लोकसभेत निवडून येत रक्षा खडसे यांनी स्वत:ला सिद्ध करुन दाखवलं आहे.

रावेर लोकसभा मतदारसंघात भाजपच्या उमेदवार रक्षा खडसे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार श्रीराम पाटील यांच्यात थेट लढत झाली. या मतदारसंघात रक्षा खडसे गेल्या १० वर्षांपासून भाजपच्या खासदार आहेत. विशेष म्हणजे रक्षा खडसे यांना यावेळी विजयाची हॅटट्रीक करण्यात यश आलं आहे.रावेर लोकसभा मतदारसंघात भाजपच्या विद्यमान खासदार रक्षा खडसे यांना मोठं यश आलं आहे. रक्षा खडसे यांचा तब्बल २ लाख २९ हजार ८७९ मतांनी विजय झालाय. रक्षा खडसे यांना या निवडणुकीत ५ लाख ४५ हजार ५९२ मते मिळाली आहेत. तर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार श्रीराम पाटील यांना ३ लाख १५ हजार ७१३ मते मिळाली आहेत. रक्षा खडसे यांची या निमित्ताने विजयाची हॅटट्रीक झाली आहे. निवडणूक काळात रक्षा खडसे यांच्याबाबत पक्षांतर्गत नाराजी असल्याच्या चर्चा समोर आल्यानंतर भाजपची धाकधूक वाढली होती. पण सलग तिसऱ्यांदा लोकसभेत निवडून येत रक्षा खडसे यांनी स्वत:ला सिद्ध करुन दाखवलं आहे.रावेर लोकसभा मतदारसंघ या लोकसभा निवडणुकीत चांगला चर्चेचा ठरला. या मतदारसंघात भाजपच्या रक्षा खडसे या विद्यमान खासदार आहेत. रक्षा खडसे यांचा २०१९ आणि २०१४ च्या लोकसभा



निवडणुकीत विजय झाला होता. त्याआधी देखील भाजपचेच उमेदवार हरिभाऊ जावळे हे जिंकून आले होते. पण २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांचं तिकीट कापून रक्षा खडसे यांना तिकीट देण्यात आलं होतं. रक्षा खडसे यांचा या निवडणुकीत विजय झाला होता. या मतदारसंघाची २००९ मध्ये निर्मिती झाली होती. रावेर लोकसभा मतदारसंघाची निवडणूक यावेळी जास्त चुरशीची ठरली. कारण या लोकसभा निवडणुकीत भाजपच्याच कार्यकर्त्यांनी रक्षा खडसे यांच्याविरोधात नाराजी व्यक्त केली होती. रक्षा खडसे आणि भाजपच्या कार्यकर्त्यांची बाचाबाची झाल्याचा व्हिडीओ समोर आला होता. तसेच शिंदे गटाचे मुक्ताईनगरचे आमदार चंद्रकांत पाटील यांनी रक्षा खडसे यांच्याबद्दल नाराजी व्यक्त केली होती. दुसरीकडे भाजपमधून राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटात गेलेले आमदार एकनाथ खडसे यांनी पुन्हा भाजपमध्ये जाणार असल्याचं जाहीर केलं. त्यामुळे रक्षा खडसे यांना या निवडणुकीत कितपत फायदा झाला? ते आज स्पष्ट होणार आहे.रावेर लोकसभा मतदारसंघात भाजपच्या उमेदवार रक्षा खडसे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार श्रीराम पाटील यांच्यात थेट लढत झाली. या मतदारसंघात रक्षा खडसे गेल्या १० वर्षांपासून भाजपच्या खासदार आहेत. तर शरद पवार गटाचे उमेदवार श्रीराम पवार हे भाजप पक्षात होते. त्यांनी गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला भाजपला सोडचिठ्ठी देत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला होता.लोकसभेच्या २०१४ च्या निवडणुकीत भाजपच्या रक्षा खडसे यांनी राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते मनीष जैन यांचा ३,१८,०६० मतांनी पराभव करत विजय मिळवला होता. यानंतर २०१९ मध्ये भाजपने पुन्हा एकदा रक्षा खडसे यांना उमेदवारी दिली. खडसे पुन्हा एकदा विजयी होऊन खासदार झाल्या. काँग्रेसचे उमेदवार डॉ. उल्हास वासुदेव पाटील दुसऱ्या क्रमांकावर होते, त्यांना ३,१९,५०४ मते मिळाली होती.२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत रावेर मतदारसंघात एकूण १८ लाख १२ हजार ६१६ मतदार होते. या मतदार संघात एसटी प्रवर्गाचे सर्वाधिक मतदार आहेत. रावेरच्या एकूण लोकसंख्येमध्ये सुमारे १४.६ टक्के एसटी प्रवर्गाचे मतदार आहेत. यानंतर दुसऱ्या क्रमांकावर मुस्लिम मतदार १४.५ टक्के आहे. एससी प्रवर्गाचे ( अनुसूचित जाती ) मतदार ११.३ टक्के आणि बौद्ध ५.१९ टक्के आहेत.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904